फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१०४/२०२३
अंकुश वि. सुभाष

**निशाणी १ खालील आदेश**

प्रस्तुतचे प्रकरण हे फिर्यादी यांनी पोलीस अहवाला व्यतीरिक्त दाखल केले आहे. सदर कामी माझे पुर्व अधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०२ प्रमाणे अहवाल सादर करण्याचा आदेश पारित केला होता. त्याप्रमाणे नि. १४ कडील तपासीक अधिकारी यांनी अहवाल दाखल करून सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्याअनुषंगाने नि. फौ. ख. क्र. ७८/२०२४ असा खटला दाखल असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे फिर्यादी यांनी नि. १६ कडे अर्ज दाखल करून सदरचे प्रकरण हे नि. फौ. ख. क. ७८/२०२४ मध्ये समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. त्यावरील अहवालानुसार सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने या न्यायालयास नि. फौ. ख. क्र. ७८/२०२४ दाखल असल्याचे दिसुन येते. नि. फौ. ख. क्र. ७८/२०२४ व सदर प्रकरणातील घटना ही एकच असल्याने तसेच पक्षकार देखील सारखे असल्याने सदरचे प्रकरण हे नि. फौ. ख. क्र. ७८/२०२४ मध्ये समाविष्ट करणे उचित होणारे आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करते.

| | **आदेश** |
|---|---|
| १. | फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २१० नुसार सदरचे प्रकरण हे नियमीत फौजदारी खटला क्र.७८/२०२४ मध्ये समाविष्ट करण्यात येते. |
| २. | सहाय्यक अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय पालम यांनी सदरची संचिका ही नियमाप्रमाणे नियमीत फौजदारी खटला क्र. ७८/२०२४ मध्ये समाविष्ट करून तशी संबंधित रजिस्टरला नोंद घ्यावी. |
| ३. | सदरचे प्रकरण बंद करण्यात येते. |

MANISHA MAHADEO PATIL
Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.03.30 10:59:20 +0530

दिनांक २७/०३/२०२६.

(मनिषा म. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालम.